देशदूत
शिल्पकार विकासाचा...
आज भविष्यवेध

## पूजा खेडकरचे प्रमाणपत्र रद्द

**नाशिक ।** भारतीय प्रशासकीय सेवेतील बडतर्फ प्रशिक्षणार्थी पूजा खेडकर यांच्या नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र प्रकरणाची सुनावणी पूर्ण होऊन त्यांचे हे प्रमाणपत्र रद्द करण्याचा निर्णय नाशिक विभागीय आयुक्त कार्यालयाने घेतला आहे. कोट्यवधींची संपत्ती व महागडी वाहने असताना नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र त्यांनी मिळवल्याचा आक्षेप होता.यात तथ्य आढळल्याने विभागीय आयुक्त कार्यालयाने हे प्रमाणपत्र रद्द केल्याचे सांगण्यात आले. या संदर्भातील अहवाल राज्य शासनाला सादर करण्यात आला आहे.




इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | जळगाव | वर्ष २८ । अंक २०८ । गुरुवार, दि. २४ जुलै २०२५ । पाने-८+८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा Android व Apple वर

## संपादकीय

### हे यंत्रणांचेच पाप

अकरा जुलै २००६ रोजी मुंबईत लोकलमध्ये झालेल्या साखळी बॉम्बस्फोटाचे खरे दोषी कोण हा प्रश्न एकोणीस वर्षांनंतरही कायम आहे. यात दोनशे नऊ लोकांचा बळी गेला तर सातशेपेक्षा अधिक लोक गंभीर जखमी झाले होते. या निकालाविरोधात राज्य सरकार सर्वोच्च न्यायालयात गेले आहे. ते सरकारला क्रमप्राप्त होते. कारण सरकारची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. जेव्हा ही भयंकर घटना घडली तेव्हाही राजकारण केले गेले आणि आताही निकालावरून राजकारणाचा आखाडा रंगायला सुरुवात झाली आहे. कदाचित लोकांचे लक्ष यावरून हटवण्यासाठी अन्य मुद्यांना पुन्हा उकळी दिली जाऊ शकेल. बॉम्बस्फोटाचा निकाल लावतांना न्यायसंस्थेने संबंधित तपास यंत्रणांवरच मोठा बॉम्ब फोडला आहे. बारा आरोपींपैकी अकरा आरोपींना निर्दोष मुक्त केले. त्याचा ठपका तपास यंत्रणेवर ठेवला आणि साक्षी पुराव्यांमधील फोलपणाचे पुरते धिंडवडे काढले. खऱ्या गुन्हेगारांना शिक्षा व्हायलाच हवी अशी टिप्पणी केली. ही तपास यंत्रणांसाठी लाजिरवाणी आणि तपासामागील हेतुंवर संशय निर्माण करणारी गोष्ट आहे. ज्यांना पकडले त्यांच्यावरचे आरोप सिद्ध करण्यात यंत्रणांना अपयश आले. इतक्या वर्षांनंतर खरे गुन्हेगार कसे शोधणार हा खरा प्रश्न आहे. घटना घडली तेव्हा खरे गुन्हेगार शोधण्यात अपयश आल्याने इतरांना त्यात अडकवून जनतेच्या डोळ्यात धूळफेक केली गेली असाही याचा एक अर्थ काढला जाऊ शकेल. देशाच्या सुरक्षिततेशी संबंधित गुन्हे सुद्धा तपासयंत्रणा किती ढिलाईने आणि बेफिकिरीने हाताळते हे यावरून अधोरेखित झाले. दोषींना शोधून शिक्षा करेपर्यंतच्या प्रवासाशी संबंधित यंत्रणांमधील मतभिन्नताही सामान्य माणसांना अस्वस्थ करणारी ठरू शकेल. अन्यायग्रस्त सामान्य लोक न्यायासाठी पहिल्यांदा पोलीस स्टेशनची पायरी चढतात. पोलीस नीट तपास करतील आणि न्याय मिळवून द्यायला मदत करतील अशी अशा त्यांना असते. पण कोणत्या अपेक्षेने यंत्रणांकडे पाहावे अशी भावना लोकांच्या मनात निर्माण झाली तर नवल नाही. कारण न्यायसंस्थेसमोर कोट्यवधी खटले प्रलंबित आहेत. तपास यंत्रणांची ढिलाई हे देखील त्याचे एक कारण मानले जाते. बॉम्बस्फोट पान २ वर

# ८ शिक्षकांनी शासनाला लावला साडेअकरा लाखांचा चुना

## चाळीसगाव येथील नॅशनल उर्दू हायस्कूलमधील घोटाळा उघड


**चाळीसगाव ।** शहरातील नॅशनल ऊर्दू हायस्कुलच्या आठ शिक्षकांनी शासनाचे आदेश नसतांना, १०० टक्के शासन अनुदान निर्णय झाल्याबाबतच्या आदेशाची खोटी प्रत तयार करुन मुख्याध्यापक यांच्याकडे सादर केली. तसेच त्यांच्याकडून पगार अनुदानाचे बिले तयार करुन ते खोटे आहेत हे माहीत असतांना सुध्दा मुख्याध्यापक सलीम खान लाल खान रा. चाळीसगांव यांनी देखील कोणतीही खात्री न करता त्या पगार बिलावर सह्या करुन ते शासनास सादर करून शासनाच्या अकरा लाख सत्तेचाळीस हजार दोनशे सदोत्तीस रुपयांचा अपहार करून शासनाची फसवणुक केली आहे.याप्रकरणी चाळीसगाव पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गटशिक्षणाधिकारी विलास आनंदा भोई यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार चाळीसगांव शहरातील नॅशनल ऊर्दू हायस्कुल ही शासन मान्य शाळा असुन सदर शाळेत इयत्ता ५ वी ते इयत्ता १० वी पावेतो वर्ग आहेत. सदर शाळेत काही शिक्षक १०० टक्के अनुदानित असुन खान वसीम अहमद मोहम्मद नूर खान, शेख शफी शेख हसन, मोहम्मद शेहजाद खान साहेब खान, शिफा नाज सैय्यद अशफाक, निकहत जहा साहेब खान कुरेशी, सैय्यद अतीक सैय्यद मजहर, मोहम्मद इफान शेख अन्सार, अब्दुल मतीन मोहम्मद हनीफ यांना शासना तर्फे २० टक्के पगार अनुदान मंजुर आहे. नमुद शिक्षकांचे पगार हे शाळेच्या प्रशासन विभागामार्फत बिले तयार करुन मुख्याध्यापकाच्या सहीने जिल्हा शिक्षण विभाग यांचे कडेस पाठविले जाते. मुख्याध्यापक म्हणुन सलीम खान लाल खान हे आहेत. या सर्वांनी आपसांत संगनमताने त्यांचे पगार २० टक्के शासन अनुदानीत असतांना ते १०० टक्के शासन अनुदान निर्णय झाल्याचे शासनाच्या आदेशाची खोटी प्रत सादर करुन १०० टक्के पगार बिले तयार करुन सदर पगार बिलावर मुख्याध्यापक सलीम खान लाल खान यांनी स्वाक्षरी करून ते जिल्हा शिक्षण विभाग, जळगांव यांचे कडे माहे जानेवारी-फेबुवारी २०२५ या महिन्याधी खालील प्रमाणे शासनाच्या रक्कमेचा अपहार करुन फसवणुक केली आहे. १०० टक्के शासन अनुदान निर्णय झाल्याबाबतचे शासनाच्या आदेशाची खोटी प्रत तयार ते खोटे आहेत हे माहीत असतांना सुध्दा मुख्याध्यापक सलीम खान लाल खान यांनी देखील कोणतीही खात्री नकरता त्या पगार बिलावर सह्या करुन ते शासनास सादर करून शासनाच्या ११,४७,२३७/-रुपयांच अपहार करून शासनाची फसवणुक केली आहे. याप्रकरणी चाळीसगाव पोलिसात गुन्हां दाखल करण्यात आला आहे.

# आजी-माजी मंत्र्यांचा वाद विकोपाला

## त्यांचे मानसिक संतुलन बिघडले !

### गिरीश महाजन यांचा खडसेंवर प्रहार



**जळगाव ।** हनी ट्रॅपचा संदर्भ देत, झाली ना त्याच्यावर कारवाई, एवढ्या कारवाया झाल्या, आता मी ऐकत होतो दोन-तीन गुन्हे कशावर असा वेगवेगळ्या ठिकाणच्या महिला आहेत. त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी मुंबईमध्ये असेल पुण्यामध्ये असेल नाशिकमध्ये असेल कोणी महिलांनी तक्रार दिली असेल तर गुन्हे दाखल होईल तुम्हाला काय एवढे पोटसूळ उठले आहे, असा टोला गिरीश महाजन यांनी खडसेंना लगावला. तुम्ही बोलणार नाहीये कारण त्यांचे मानसिक संतुलन खरेच बिघडलेले आहे आता मी त्यांची मुलाखत बघत होतो मोबाईलवर कोणीतरी मला दाखवली ती खरंच मला त्याची कीव येत आहे. म्हणजे मला राग येत नाही खडसेंचा पण कीव येते, असे वक्तव्य महाजनांनी केले.

ना.गिरीश महाजन आणि आ. एकनाथराव खडसे या दोन नेत्यांचे विळा-भोपळ्याचे वैर सर्वांनाच माहिती आहे. खडसे भाजपमधून साईडलाईन झाल्यानंतर त्यांनी राष्ट्रवादीची वाट धरली. तर गेल्या वर्षी त्यांनी भाजपच्या दिल्ली नेतृत्वाशी गाठीभेटी घेतल्या होत्या. माशी कुठं शिंकली ते कळले नाही पण भाजपात पुनरागमनाच्या खडसेंच्या चर्चांना विराम मिळाला. खडसे आणि महाजन एकमेकांना संधी मिळेल तसे डिवचतात. आता महाजन यांनी पुन्हा एकदा खडसेंवर निशाणा साधला आहे.

### दिल्लीत जाऊन आडवे पडून पाया पडतात!

आता हे म्हणतात मी काय केले? तुमचे ते भोसरी प्रकरण माहिती आहे. तुम्ही चोऱ्यामाऱ्या करता. डाके टाकता आणि वर दिल्लीत जाऊन आमच्या नेत्यांच्या अक्षरशः आडवे पडून पायावर पडतात. आणि त्यांच्याकडून सूट मिळवून देत आहे. म्हणून सगळा प्रकार चाललेला आहे. माफ करा, माफ करा,हा धंदा त्यांचा चाललेला आहे, असा टोला महाजनांनी खडसेंना लगावला. ते वायफळ बडबड करतात. त्यांचे मानसिक संतुलन बिघडले आहे. त्यांना इतके असह्य झालेले बघवत नाही. त्यामुळे त्यांच्यावर मी फार बोलणार नाही, असे महाजन म्हणाले.



### लोढाने २०० कोटी कमावले

महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून हनी ट्रॅप प्रकरण चर्चेत आले आहे. नाना पटोले यांनी या संदर्भातला आरोप केला होता. प्रफुल लोढा प्रकरणाचीही चर्चा होते आहे. आता या प्रकरणात अनेक लोक अडकले आहेत असे विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे. कोणत्याही पक्षाचा माणूस असो त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे असेही विजय वडेट्टीवार म्हणाले. हनी ट्रॅपचे खूप मोठे रॅकेट आहे. त्यात अनेक मोठे मासे अडकले आहेत. मंत्री, राजकारणातले अनेक आजी-माजी मंत्री यामध्ये आहेत. ज्याचे नाव पुढे आले तो लोढा याने अनेकांकडून पैसे घेतले आहेत. त्याने किमान २०० कोटींची वसुली केली आहे असा आरोप वडेट्टीवार यांनी केला आहे.

## देवाभाऊंचा आशीर्वाद असेपर्यंतच किंमत

### खडसेंचा महाजनांवर हल्लाबोल



**जळगाव ।** प्रफुल्ल लोढाकडे असलेले मटेरियल त्याने इतरांना देऊ नये आणि तोंड उघडू नये यासाठी त्याला वारंवार पोलीस कोठडीत ठेवण्याचा प्रयत्न होत आहे . तो जर बाहेर आला तर आपले कारनामे उघड होतील अशी भिती मनात आहे,पण जोपर्यंत देवा भाऊचा आशीर्वाद आहे तोपर्यंत गिरीश महाजन यांची किंमत आहे, एकदा देवेंद्रजी यांनी डोक्यावरचा हात काढला की महाजनांना सळो की पळो करावे लागेल असा हल्लाबोल आ.एकनाथराव खडसे यांनी महाजनांवर केला आहे. हा लोढा जर बाहेर आला किंवा जामीनावर आला तर, त्याच्याकडून सत्य निघाल्यास यांचा पर्दाफाश होऊ शकतो, मी जे आहे ते उमद्या मनाने करणारा माणूस आहे, मी मागून वार करणारा माणूस नाही या शब्दात एकनाथराव खडसे यांनी गिरीश महाजन यांना प्रत्युत्तर दिले आहे.

**मी मागून काड्या केल्या नाहीत**

आतापर्यंत मी लढलो ते समोरून लढलो, मागून काड्या केल्या नाही हा जो प्रफुल्ल लोढा आहे, तो गिरीश महाजन यांच्या बंगल्यामध्ये सातत्याने राहायचा. महाजन मंत्री असताना त्यांच्यासोबत तो रहायचा, यात पुरावा देण्याची काही गरज नाही कुणीही सांगू शकेल.मी असे कधीच म्हटले नाही की लोढा मला भेटला नाही. मी पहिल्या मुलाखतीतच म्हटले पान २ वर

### मानसिक संतुलन माझं की गिरीशचे बिघडले?

देवा भाऊ यांना मी सल्ला देणार नाही, मात्र ते योग्य निर्णय घेतील असा मला विश्वास आहे. तुम्हाला काय वाटते मानसिक संतुलन माझे बिघडले की गिरीशचे बिघडले असा सवालही खडसेंनी विचारला. गिरीश भाऊंची चांगली ख्याती आहे. सर्वांनाच माहिती आहे,ज्यावेळी प्रफुल्ल लोढा यांचा भाजपमध्ये प्रवेश झाला त्यावेळी रामेश्वर नाईक हा त्या ठिकाणी उपस्थित होता. रामेश्वर नाईक यांनी जीवे मारण्याची धमकी दिली होती असे प्रफुल लोढा यांनी म्हटले आहे. आणि धमकी देणारेच आज मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयात आहेत.

## विरोधी पक्षनेते पदावर काँग्रेसचा दावा



**मुंबई ।** विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची सदस्यत्वाची मुदत पुढील महिन्यात संपणार असल्याने काँग्रेसने विरोधी पक्षनेतेपदावर दावा सांगितला आहे. दानवे यांच्या निवृत्तीनंतर रिक्त होणाऱ्या विरोधी पक्ष नेतेपदासाठी काँग्रेसकडून सतेज उर्फ बंटी पाटील यांचे नाव आघाडीवर आहे. सध्या सतेज पाटील हे विधानपरिषदेत काँग्रेसचे गटनेते म्हणून कार्यरत आहेत.

नुकत्याच पार पडलेल्या राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात दानवे यांची विधान परिषद सदस्यत्वाची मुदत पुढील महिन्यात म्हणजे २९ ऑगस्ट रोजी संपत आहे. त्यानुसार त्यांना अधिवेशनात निरोप देण्यात आला. तरीही दानवे हे २९ ऑगस्टपर्यंत विरोधी पक्षनेतेपदावर असणार आहेत. औरंगाबाद- जालना स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातून निवडून आलेल्या अंबादास दानवे यांच्या निवृत्तीने शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे विधानपरिषदेतील संख्याबळ कमी झाले आहे. त्यामुळे काँग्रेसने जास्त संख्याबळाच्या आधारे विरोधी पक्षनेतेपदावर दावा केला आहे.

विधानपरिषदेत काँग्रेसचे सात तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे तीन सदस्य आहेत. याशिवाय काही अपक्ष आमदारांचा पाठिंबा काँग्रेसला आहे. या आधारे काँग्रेसने विरोधी पक्षनेतेपद मिळवण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत.

## गडकरींना टिळक पुरस्कार



**पुणे ।** केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना २०२५ चा प्रतिष्ठित लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टच्यावतीने हा सन्मान प्रदान केला जाईल. शुक्रवार, १ ऑगस्ट रोजी लोकमान्य टिळकांच्या १०५ व्या पुण्यतिथीनिमित्त होणाऱ्या विशेष सोहळ्यात गडकरींना हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल. लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. रोहित टिळक यांनी पत्रकार परिषद घेत याबद्दलची माहिती घेतली.

यावेळी पुरस्कार वितरण सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आणि माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे उपस्थित राहणार आहे. डॉ. रोहित टिळक यांच्या हस्ते आणि या मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्काराचे वितरण होईल. या सोहळ्यात टिळक महाविद्यालयाच्या कुलगुरू व टिळक स्मारक ट्रस्टच्या विश्वस्त डॉ. गीताली टिळक, टिळक महाविद्यालय ट्रस्टच्या आणि टिळक स्मारक ट्रस्टच्या विश्वस्त उपस्थित राहणार आहेत.

## कुख्यात गुन्हेगार परदेशी स्थानबद्ध

**धुळे ।** शहरातील कुख्यात, सराईत गुन्हेगार परशुराम परदेशी याच्यावर एमपीडीएन्वये एक वर्षाची स्थानबद्धतेची कारवाई करण्यात आली आहे. त्याची नाशिक मध्यवर्ती कारागृहात रवानगी केली जाणार आहे. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या शिफारशीनुसार, जिल्हाधिकाऱ्यांनी ही कारवाई केली.

परशुराम ऊर्फ पुरुषोत्तम रघुवीर परदेशी याच्यावर गेल्या काही वर्षांत आझादनगर, चाळीसगावरोड व मोहाडीनगर पोलीस ठाण्यांत दरोडा, जीवघेणा हल्ला, सरकारी कामात अडथळा, सार्वजनिक मालमत्तेची तोडफोड, अग्निशस्त्र वापर आदी गंभीर गुन्ह्यांसह विविध कायद्यांखाली सहा गुन्हे दाखल आहेत. या पार्श्वभूमीवर आगामी सण व निवडणुका लक्षात घेता नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी ही कारवाई करण्यात आली.

चाळीसगावरोड पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुरेशकुमार घुसर यांनी प्रस्ताव तयार करून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक श्रीराम पवार यांच्या छाननीनंतर जिल्हाधिकारी यांच्या मंजुरीसाठी सादर केला होता. जिल्हादंडाधिकारी, धुळे यांनी २२ जुलै रोजी सदर प्रस्ताव मंजूर करत परदेशी यास एमपीडीए अंतर्गत नाशिक मध्यवर्ती कारागृहात एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले.पुढील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून परदेशी याची रवानगी नाशिक सेंट्रल जेलमध्ये करण्यात येणार आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस पान २ वर

## मध्य प्रदेश परिवहनच्या बसचा शहादा आगारात अनधिकृत प्रवेश; शाब्दिक चकमकीवरुन प्रकरण थेट हाणामारीवर

# प्रवासी पळवापळवीवरुन ‘दांगडो’

**नरेंद्र बागले । शहादा**

शहादा आगारात मध्य प्रदेश परिवहन विभागाची बस विनापरवाना प्रवेश करून प्रवाशांची पळवा- पळवी करीत असलेल्या वाहकाला शहादा आगाराच्या कर्मचाऱ्यांनी जाब विचारला असता उलट त्यांना दमबाजी करत मोठा दांगडो घातला. शाब्दिक चकमकीवरून प्रकरण थेट हाणामारीवर गेल्याने हा दांगडो पाहण्यासाठी प्रवासी व विद्यार्थ्यांनी मोठी गर्दी केली होती. ही घटना आज दुपारी चार वाजेच्या सुमारास घडली. दरम्यान, आगार प्रमुख हरीश भोई यांनी मध्यप्रदेश परिवहनची बस जप्त न करता अथवा त्या चालक वाहकावर कायदेशीर कारवाई न करता सोडून दिल्याने



शहादा आगारात त्यांच्या कार्यप्रणालीवर कर्मचाऱ्यांमधून रोष व्यक्त होत आहे.

मध्यप्रदेश परिवहन विभागाच्या सात ते आठ बसेस शहादा मार्गे नंदुरबार दोंडाईचा व सुरत येथे जात असतात. यातील काही बसेसना परमिट नसल्याचे अनेकदा उघड झालेले असतानाही सर्रासपणे शहादा आगारात



अनधिकृतपणे प्रवेश करून प्रवाशांची पळवा पळवी करत आगाराचे आर्थिक नुकसान करीत आहेत. आज दि.२३ रोजी दुपारी चार वाजता सेंधवा-खेतिया ते शहादा बस (क्रमांक एमपी ४६ झेड एफ ९७५६) ने अनधिकृतपणे प्रवेश करून प्रवाशांची पळवापळवी करणाऱ्या वाहक व चालकास जाब विचारणाऱ्या शहादा आगारातील कर्मचाऱ्यांशी हुज्जत घालून दमबाजी करत मोठा दांगडो घातला. शाब्दिक चकमकीवरून हे प्रकरण थेट हाणामारीपर्यंत गेले. यावेळी आगारात प्रवासी व विद्यार्थ्यांची आणि शहादा आगारातील कर्मचाऱ्यांची मोठी गर्दी झाली होती. त्यानंतर शहादा आगारातील कर्मचाऱ्यांनी मध्यप्रदेश परिवहनच्या त्या उर्मट वाहकास आगार प्रमुख हरीश भोई यांच्याकडे धरून नेले असता आगार प्रमुखांनी देखील त्यास अभय देत सोडून दिले. उलट आगार प्रमुखांनी सदर बस जप्त करून त्या वाहक व चालकावर कायदेशीर कारवाई करणे अपेक्षित असताना त्यांना सोडून दिल्याने शहादा आगारात कर्मचाऱ्यांमध्ये आगार प्रमुखांच्या कृतीवर तीव्र रोष व्यक्त केला आहे.

### आगार प्रमुखांचे आर्थिक साटेलोटे?

शहादा आगारातील या घटनेमुळे आगारप्रमुख हरीश भोई यांची कार्यप्रणाली पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली आहे. ठेकेदारी पद्धतीवर असलेल्या मध्यप्रदेश परिवहनच्या शहादा आगारात बिनधास्त प्रवेश करणाऱ्या काही बसेसला परमिट नसल्याचे अनेकदा उघडकीस आले असतानाही विनापरवाना शहादा आगारातून प्रवाशांची पळवापळवी करत आगाराचे आर्थिक नुकसान करीत आहेत. असे असतानाही आगार प्रमुखांकडून मध्य प्रदेशच्या बसेसवर आतापर्यंत कुठलीही कार्यवाही झालेली नाही. उलट या बसेसच्या ठेकेदारासोबत शहादा आगार प्रमुखांचे आर्थिक साटेलोटे असल्याची चर्चा कर्मचाऱ्यांमध्ये दबक्या आवाजात सुरू होती. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची विभाग नियंत्रकांकडून चौकशी होणे अपेक्षित आहे.

### केळी भाव

नवती (१) : 2400
नवती (२) : 2200

### मिश्कीली

